स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक
निवडणुका-२०१६-१७
क्षेत्र व हद्दीमध्ये बदल न करण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. ७/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० जुलै, २०१५.

प्रति,
प्रधान सचिव,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

प्रधान सचिव,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका सन २०१६-१७
क्षेत्र व हद्दीमध्ये बदल न करण्याबाबत...
संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२००५/प्र.क्र.५/का-५,
दिनांक २७/१/२००५.

महोदय,

आपल्याला माहितच आहे की, भारतीय संविधान व संबंधित कायद्यांच्या तरतुदीनुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांची मुदत संपण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे होणे आवश्यक आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तीन मुख्य टप्पे असतात :-

(i) प्रभाग रचना,
(ii) मतदार यादी विभाजन व
(iii) प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया

हे तीनही टप्पे नियमानुसार पूर्ण करण्यास कमीत कमी सहा महिन्यांचा कालावधी लागतो.

३. लोकांच्या मागणीप्रमाणे राज्य शासन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल करीत राहते. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण येऊ नये याकरिता राज्य निवडणूक आयोगाने संदर्भीय आदेशाद्वारे **"स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने आधीपासून त्यां च्या हद्दीमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये"** असे आदेश दिले आहेत. (प्रत संलग्न)

४. राज्यामध्ये बहुतांशी महानगरपालिका, नगर परिषदा/नगरपंचायती व जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांच्या मुदती खाली दर्शविल्याप्रमाणे २०१६-१७ मध्ये संपत आहेत:-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | संख्या व मुदत समाप्तीचा महिना | मुदत समाप्तीच्या महिन्याच्या सहा महिन्यांपूर्वीचा महिना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | महानगरपालिका | १० -मार्च-२०१७(बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर) | ऑगस्ट-२०१६ |
| १. | नगर परिषदा/नगर पंचायती | १६५ - डिसेंबर-२०१६<br>२- जानेवारी-२०१७<br>२८ - फेब्रुवारी-२०१७ | मे - २०१६<br>जून- २०१६<br>जुलै-२०१६ |
| २. | जिल्हा परिषदा | २६ -मार्च-२०१७ | ऑगस्ट-२०१६ |
| ३. | पंचायत समिती | २९७-मार्च-२०१७ | ऑगस्ट-२०१६ |

५.	राज्यामध्ये वरील महानगरपालिका, नगर परिषदा/नगरपंचायती व जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका त्यांची मुदत संपण्यापूर्वी सन २०१६-१७ मध्ये होणार आहेत. हे लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.५/का-५, दिनांक २७/१/२००५ नुसार त्यांची मुदत संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर (वरील तक्त्यातील रकाना क्र.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) करण्यात यावा. सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना केलेला क्षेत्र बदल शक्यतो ग्राह्य धरले जाणार नाहीत.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

10-7-2015

( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

F:\Anagha\नप- जिपपंस- मनपा निवडणूक-२०१६-१७.docx

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र. ५/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २७ जानेवारी, २००५.**

**आ दे श**

भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए अनुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर टाकलेली आहे. निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये मतदार संघ तयार करणे, मतदार यादी तयार करणे व प्रत्यक्ष निवडणुका घेणे या बाबी समाविष्ट होतात.

२. निवडणुकांसाठी मतदार संघ तयार करताना अडचणी येऊ नयेत व एकसूत्रीपणा राहावा या दृष्टीकोनातून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व २४३झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई नियम क्रमांक-३) चे कलम ५, १८अ(४), कलम १९(१), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम क्रमांक-२) चे कलम ९ व कलम ९ ब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक-५९) चे कलम ५ व कलम १४(४) व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५(१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-४०), चे कलम १० व कलम १०अ(४) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा अधिनियम, १९६१ चे कलम २ मधील उपकलम (२०अ), महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ९ च्या उपकलम (१) मधील खंड (अ) व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० नुसार मी नन्द लाल, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक साधारणपणे कधी होणार हे पूर्वीपासूनच माहित असते. निवडणुकीची तयारी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवसाच्या किमान ६ महिने आधीपासून सुरु होते. या प्रक्रियेत स्थानिक स्वराज्य संस्थांचे मतदार संघांमध्ये विभाजन करणे ही प्रक्रिया अतिशय महत्वाची आहे. या प्रक्रियेत कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी निवडणुका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्या महिन्यांच्या सहा महिने आधीपासून कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये परिवर्तन करण्यात येऊ नये. हद्दवाढ

करण्याच्या प्रत्येक प्रस्तावाच्या आधी राज्य निवडणूक आयोगाकडून त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत कधी संपणार आहे व हद्दवाढीसंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यास कोणतीही अडचण येणार नाही, याची राज्य निवडणूक आयोगाकडून माहिती करुन घ्यावी.

**( नन्द लाल )**
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व महानगरपालिका आयुक्त,
५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
८. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
१०. निवड नस्ती